राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ

क्रमांक- रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र. १८/का.५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक - ४/२/२०१२

प्रति,
आयुक्त,
ठाणे आणि उल्हासनगर महानगरपालिका.

विषय :- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१२
चिन्ह वाटपाबाबतचे जोडपत्र १ व २.

महोदय,

आपल्या दि. ३ फेब्रुवारी, २०१२ च्या पत्रांन्वये अपक्ष उमेदवाराने अथवा ज्या पक्षातर्फे नामनिर्देशनपत्र भरले आहे तो पक्ष सोडून अन्य पक्षाचे जोडपत्र १ व २ सादर केल्यास अशा उमेदवारास त्या अन्य पक्षाचा उमेदवार मानता येईल किंवा कसे याबाबत विचारणा केली आहे.

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. एसईसी/आरपीपी/२००९/सी.आर.४९/का.११, दि. ३१ मार्च, २००९ च्या परिच्छेद ९ मध्ये उमेदवार राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत असल्याचे केव्हा समजले जाईल हे नमूद केले आहे. त्यानुसार उमेदवाराने नामनिर्देशनपत्रात तशी घोषणा (अशी घोषणा त्याच्या कोणत्याही एका नामनिर्देशनपत्रात असली तरी चालेल) करणे आवश्यक असून विहित कालावधीमध्ये जोडपत्र १ व २ सादर करणे आवश्यक आहे. या दोन्ही बाबींची पुर्तता होत नसल्यास अशा उमेदवारास पक्षाचा उमेदवार मानता येणार नाही.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

आपला,

( डॉ. अशोक कोल्हे )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत- आयुक्त, बृहन्मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती, नागपूर, औरंगाबाद व सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका.

D:\D 5\election 2012 gen refr .doc/mahale